INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

# पश्चिम विदर्भातील कृषिव्यवस्था आणि जातीसंरचनेतील आंतरसंबंधाचा अभ्यास

रमेश बंडू पवार,

संशोधक विद्यार्थी,

समाजशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती.

rameshsbpawar@gmail.com ; 9011660015.

---

गोषवारा –

*"मुस्लिम किंवा शिखाला तो कोण आहे असे विचारा, तो तुम्हाला, तो जो असेल त्या प्रमाणे मी मुस्लिम आहे, मी शीख आहे असे सांगतो. त्याला जात असूनही तो ती सांगत नाही आणि त्याचा उत्तराने तुमचे समाधानही होते... एखाद्या व्यक्तीने मी हिंदू आहे असे सांगितले तर तुमचे समाधान होत नाही. तुम्हाला त्याची जात विचाराविच वाटते."*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे विधान आजमितीस पण भारतातील बहुसंख्य लोकांना जसेच्या तसे लागू होते. आजही अर्जित (कर्तृत्वाने) प्रस्थीती (पद) पेक्षा अर्पित (जन्माने) प्रस्थीतीला अधिक महत्व समाजाद्वारे दिल्या जाते. भारतीय समाजव्यवस्था ही जातिआधारीत समाजव्यवस्था असून त्याद्वारे येथील सामाजिक-आर्थिक, राजकीय संबंधांचा व्यावहारिक क्रम ठरत आलेला आहे आणि आजही काही प्रमाणात असेच व्यवहार आपल्या परिसरात घडताना दिसते. कारण भारतीय समाजजीवन या व्यवस्थेद्वाराच निर्धारित होते. याच सामाजिक अगतीशीलतेमुळे भारतातील बहुसंख्य समुदायाला सामाजिक-आर्थिक-राजकीय-शैक्षणिक घटकांपासून वंचित राहावे लागले आणि त्याची परिणीती भारत देशाच्या विकसनशील अर्थव्यवस्थेच्या रूपात आपण पाहत आहो.

पश्चिम विदर्भ महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा कृषिआधारित व्यवस्था आणि शेतकरी आत्महत्येचा केंद्रबिंदू म्हणून कुप्रसिद्ध असलेला प्रदेश आहे. येथिल कृषिव्यवस्था ही अल्पभूधारक शेतकरी, सिंचनाचा अभाव, कमी उत्पादकता, अस्मानी संकटे आणि राजकीय असंवेदनशीलता यासारख्या प्रश्नाने ग्रासली आहे. सोबतच पश्चिम विदर्भातील जातीय संरचना ही ऐतिहासिकदृष्ट्या सामाजिकसह आर्थिक आणि राजकीयहित यामध्ये जटिल व अत्यंत गुंतागुंतीचे आंतरसंबंध आहे असे आपल्याला पाहावयास मिळते. यामागे प्रामुख्याने जातीय संरचना कारणीभूत असल्याचे काही अभ्यासांती असे दिसून येते.

हा अभ्यास ऐतिहासिक दृष्टिकोन, संरचनात्मक-कार्यवादी आणि संघर्ष सिद्धांत यांच्या आधारे केला आहे. ब्रिटिश काळातील जमीन महसूल व्यवस्था, स्वातंत्र्योत्तर जमीन सुधारणा, हरितक्रांती, सहकारी चळवळ, उदारीकरणोत्तर कृषिसंकट आणि शेतकरी आत्महत्या या प्रक्रियांमधून जातीय विषमता कशी पुनरुत्पादित होत गेली याचा शोध घेण्यात आला आहे.

सदर अभ्यासातून असे दिसून येते की कृषिव्यवस्थेतील तांत्रिक व आर्थिक बदल असूनही जात ही केवळ सांस्कृतिक नव्हे तर भौतिक वास्तव घडवणारी शक्ती आहे. जमीन, पाणी, पतपुरवठा, शासकीय योजना आणि राजकीय सत्तेपर्यंतचा प्रवेश अजूनही मोठ्या प्रमाणावर जातीय आधारावर ठरतो. त्यामुळे कृषी विकासाचा प्रश्न हा केवळ आर्थिक नसून तो सामाजिक न्यायाशी निगडित आहे, असा निष्कर्ष या लेखातून मांडण्यात आला आहे. प्रस्तुत अभ्यास पूर्णतः दुय्यम तथ्यावर आधारीत असून स्पष्टीकरणासाठी विश्लेक्षनात्मक पद्धती प्रामुख्याने वापरण्यात आली आहे.

**प्रमुखशब्द**- जात, जमीन, पश्चिम विदर्भ, कृषि व्यवस्था, कृषिसंरचना

## प्रस्तावना

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

भारतीय समाज हा पारंपरिकदृष्ट्या कृषिप्रधान समाज राहिला आहे. शेती ही केवळ उत्पादनाची प्रक्रिया नसून ती सामाजिक संबंध, सत्तासंरचना आणि सांस्कृतिक मूल्ये घडवणारी एक महत्त्वाची संस्था आहे. भारतातील कृषिव्यवस्थेचा अभ्यास करताना जातीय संरचनेचा विचार केल्याशिवाय तो अपूर्ण ठरतो. जात ही भारतीय समाजातील एक मूलभूत सामाजिक संस्था असून तिने ऐतिहासिकदृष्ट्या श्रमविभागणी, संसाधनांचे वाटप आणि सामाजिक दर्जा निश्चित केला आहे.

पश्चिम विदर्भ हा महाराष्ट्रातील तुलनेने मागास, कोरडवाहू आणि कृषिसंकटग्रस्त प्रदेश म्हणून ओळखला जातो. कापूस, सोयाबीन, तूर, हरभरा, संत्री ही येथील प्रमुख पिके असून अनिश्चित पर्जन्यमान, कमी सिंचन सुविधा आणि बाजारातील अस्थिरता यांमुळे येथील शेतकरी मोठ्या संकटात सापडलेले दिसतात. मात्र या संकटाचा परिणाम सर्व जातीय गटांवर समान स्वरूपाचा नाही. जातीय स्थानानुसार या संकटाचा अनुभव वेगवेगळ्या प्रकारे येतो.

पश्चिम विदर्भातिल शेतकऱ्यांच्या समस्येवर विविध सामाजिक शास्त्रज्ञानी अनेकांगाणी अभ्यास केलेला आहे. पण जातीव्यवस्था आणि शेती प्रश्न घटकाच्या दृष्टिने प्रामुख्याने पाहिजे तेवढे लक्ष दिल्या गेले नाही परिणामी समस्या सोडविण्यास अपयश आल्याचे दिसते. पश्चिम विदर्भातील कृषिव्यवस्था आणि जातीसंरचना यांच्यातील आंतरसंबंधांचा सखोल समाजशास्त्रीय अभ्यास करण्याचा प्रयत्न करतो. विशेषतः जमीनधारणा, कृषी श्रम, सामाजिक विषमता, राजकीय सत्ता आणि विकास धोरणे या संदर्भात जात कशी कार्य करते याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**अभ्यास क्षेत्र : पश्चिम विदर्भ**

पश्चिम विदर्भात अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशीम या जिल्ह्यांचा समावेश होतो. हा प्रदेश भौगोलिकदृष्ट्या दख्खन पठारावर वसलेला असून मृदा मुख्यतः काळी (रेगूर) आहे. येथील शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे.

सामाजिकदृष्ट्या हा प्रदेश बहुजातीय आहे. मराठा-कुणबी हा प्रमुख शेतकरी वर्ग असून, ब्राह्मण आणि वैश्य वर्ग ऐतिहासिकदृष्ट्या सावकारी, महसूल व प्रशासनात प्रभावी राहिले आहेत. दलित, आदिवासी भटके विमुक्त समाज मोठ्या प्रमाणावर भूमिहीन शेतमजूर किंवा अल्पभूधारक म्हणून शेतीशी निगडित आहेत.

**साहित्याचा आढावा :**

जमीनधारणा, पिकपद्धती, श्रमविभागणी, शेतीतील तंत्रज्ञान, तसेच बाजारपेठेतील सहभाग या सर्व घटकांवर जात ही एक प्रभावी सामाजिक संस्था म्हणून कार्य करत आलेली आहे. प्रस्तुत लेखामध्ये पश्चिम विदर्भातील (अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशीम) कृषिव्यवस्थेचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्यात आला असून, कृषि समस्येला जातीय श्रेणीव्यवस्था कशाप्रकारे कृषिसंबंधांना आकार देते, घडवते आणि कृषिव्यवस्थेतील बदल जातीय संबंधांवर कसा परिणाम करतात याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील असमान कृषी विकासावर राजकीय आणि सामाजिक संरचनांचा, विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील जात आणि नातेसंबंधांच्या जाळ्यांचा, लक्षणीय परिणाम होतो. महाराष्ट्रात जमीन उपलब्धता आणि कृषी संबंधांना जाती मूलभूतपणे बांधतात, ज्यामध्ये प्रमुख जाती संसाधनांवर नियंत्रण ठेवतात तर खालच्या जाती आणि दलितांना पद्धतशीर बहिष्कार आणि संघर्षाचा सामना करावा लागतो. (बी. बी. मोहंती)

पुराव्याचे अनेक आयाम आहेत. ऐतिहासिकदृष्ट्या, वतन व्यवस्थेने वसाहतपूर्व पश्चिम भारतात जाती-आधारित जमीन हक्क आणि कामगार विभागणी निर्धारित केली होती, जी ब्रिटिश वसाहतवादी राजवटीत हळूहळू विघटित झाली., स्वातंत्र्यानंतर, मराठा-कुणबी शेतकरी एक संयुक्त राजकीय वर्ग म्हणून उदयास आले आणि त्यांनी जातीच्या जाळयांद्वारे राज्याच्या राजकारणावर वर्चस्व गाजवले, ज्यामुळे पश्चिम महाराष्ट्राचा जलद कृषी विकास शक्य झाला तर इतर प्रदेश मागे राहिले. (बी.बी. मोहंती.)

मध्ययुगीन पश्चिम भारतातील स्थानिक समाजाची रचना आणि कार्य समजून घेण्यास मदत करणारी प्रमुख संकल्पना म्हणजे वतन व्यवस्था. या व्यवस्थेने ग्रामीण समुदाय तसेच परगणा (जिल्हा) मध्ये श्रमविभाजनाचे निर्देश दिले आणि शेतकऱ्यांना त्यांनी लागवड

केलेल्या जमिनींवर त्यांचे जमीन हक्क, स्थानिक समाजातील वर्ग संबंध आणि जात समुदायात काम करणाऱ्या पदानुक्रमित संबंधांचे निर्धारण केले. (कोटणी हुरोउकि)

पारंपारिक सरंजामशाही समाजात जाती शेती संबंधांना आकार देतात, ज्यामध्ये दोन प्रमुख संघर्ष आहेत: मध्यम जातीचे शेतकरी जमीनदारी विरुद्ध आणि दलित मजूर मजुरी आणि जमिनीसाठी, "जमीन नांगरणाऱ्याकडे" या घोषणेवर प्रभाव पाडतात. (गेल ओमवेट)

ग्रामीण भारतातील दलित कुटुंबांमध्ये भूमिहीनता ही एक व्यापक वैशिष्ट्य आहे. ग्रामीण भागात दलितांच्या एका विशिष्ट सामाजिक गटाच्या अस्तित्वासाठी भूमिहीनता ही पायाभूत सुविधा आहे; ती आर्थिकदृष्ट्या गैर-आर्थिक क्षेत्रातही दलितांच्या वर्चस्व आणि शोषणासाठी भौतिक आधार बनवते. अशा प्रकारे जातिव्यवस्थेत सामाजिक दडपशाही आणि वर्ग शोषण या दोन्ही घटकांचा समावेश आहे. (आर. रामकुमार, तुषार कांबळे )

महाराष्ट्रातील एक प्रमुख मध्यमवर्गीय शेतकरी जात असलेल्या मराठा समुदायाला त्यांच्या राजकीय वर्चस्वाच्या आव्हानांचा सामना करावा लागतो, ज्यामध्ये वर्चस्व गमावणे आणि अंतर्गत संकटांचा समावेश आहे. (राजेश्वरी देशपांडे, सुहास पळशीकर)

## सैद्धांतिक चौकट

### संरचनात्मक-कार्यवादी दृष्टिकोन

या दृष्टिकोनानुसार जात आणि शेती या समाजाच्या स्थैर्यासाठी परस्परपूरक भूमिका बजावतात. पारंपरिक समाजात जातीनुसार श्रमविभागणी ही कृषिव्यवस्थेच्या कार्यक्षमतेसाठी आवश्यक मानली जात होती.

### संघर्ष सिद्धांत

मार्क्सवादी आणि आंबेडकरी दृष्टिकोनातून पाहता, जात ही शोषणाची आणि विषमतेची रचना आहे. जमीन आणि उत्पादन साधनांवर प्रभुत्व असलेल्या जाती इतर जातीय गटांचे शोषण करतात.

### आंबेडकरी दृष्टिकोन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जात आणि जमीन या प्रश्नांना सामाजिक न्यायाच्या चौकटीत पाहिले. त्यांच्या मते जमीन सुधारणा केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक क्रांतीचे साधन आहे.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी : कृषिव्यवस्था आणि जात

ब्रिटिश काळात लागू झालेल्या जमीन महसूल व्यवस्थेमुळे (रैयतवारी पद्धत) जमीन वैयक्तिक मालकीमध्ये आली. मात्र ही मालकी प्रामुख्याने उच्च व मध्यम जातींकडे केंद्रीत झाली. दलित, आदिवासी आणि भटके विमुक्त समाज शेतीपासून दूर ढकलले गेले.

स्वातंत्र्यानंतर जमीन सुधारणा कायदे अस्तित्वात आले, परंतु पश्चिम विदर्भात त्यांची अंमलबजावणी मर्यादित राहिली. त्यामुळे जातीय जमीन विषमता मोठ्या प्रमाणावर टिकून राहिली.

## जमीनधारणा आणि जातीय विषमता

पश्चिम विदर्भात मोठ्या व मध्यम भूधारकांमध्ये मराठा-कुणबी जातींचे वर्चस्व दिसते. दलित आणि आदिवासी समाजाकडे जमीन कमी असून तीही बहुतेकदा कोरडवाहू आणि कमी प्रतीची आहे.

जमीन ही केवळ उत्पादनाचे साधन नसून सामाजिक प्रतिष्ठेचे प्रतीक आहे. त्यामुळे जमीनधारणेतील विषमता ही सामाजिक विषमतेला अधिक बळ देते.

## कृषी श्रमविभागणी आणि जात

शेतीतील श्रमविभागणी आजही मोठ्या प्रमाणावर जातीय आधारावर आहे. दलित व आदिवासी समाज प्रामुख्याने शेतमजुरी, कष्टाची कामे आणि कमी मोबदला मिळणाऱ्या कामांमध्ये गुंतलेला आहे. याउलट जमीनधारक जाती व्यवस्थापन, बाजार व्यवहार आणि राजकीय निर्णयप्रक्रियेत सक्रिय आहेत.

**हरितक्रांती, तंत्रज्ञान आणि जात**

हरितक्रांतीचा लाभ पश्चिम विदर्भात मर्यादित राहिला. ज्या भागात लाभ झाला, तिथेही त्याचा फायदा मुख्यतः मोठ्या भूधारकांना झाला. तंत्रज्ञान, बियाणे, खते आणि सिंचन यांपर्यंतचा प्रवेश जातीय व आर्थिक स्थानावर अवलंबून राहिला.

**कृषिसंकट, शेतकरी आत्महत्या आणि जात**

पश्चिम विदर्भातील शेतकरी आत्महत्यांचे संकट हे कृषी अपयशाचे टोकाचे रूप आहे. अभ्यासातून असे दिसते की आत्महत्या करणाऱ्यांमध्ये मध्यम भूधारक मागासवर्गीय जातीतील शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त आहे, तर दलित, आदिवासी आणि भटके विमुक्त समाज दीर्घकालीन दारिद्र्य सहन करत असला तरी त्यांची वेदना अनेकदा अदृश्य राहते.

**राज्य धोरणे, राजकारण आणि जात**

कृषी धोरणे, सहकारी संस्था आणि पंचायत राज व्यवस्था यांमध्येही जातीय राजकारण प्रभावी आहे. साखर कारखाने नसले तरी कापूस संघ, बाजार समित्या आणि सहकारी बँका या माध्यमातून वर्चस्वशाली जाती सत्ता टिकवून ठेवतात. त्यामुळे मागासवर्गीय जातींकडे या संस्थेचे महत्वाचे पद प्रामुख्याने खूप अल्प प्रमाणात असतात त्यांना राजकीय आरक्षण हे सदस्यत्व करिता अधिक असते असे निदर्शनास येते.

**निष्कर्ष**

पश्चिम विदर्भातील कृषिव्यवस्था आणि जातीसंरचना यांचे नाते हे परस्परावलंबी आणि संघर्षपूर्ण आहे. कृषी विकासाच्या प्रक्रिया जातीय विषमता कमी करण्यात अपयशी ठरलेल्या दिसतात. एकूणच, शेती आणि जात यांमधील संबंध हा केवळ आर्थिक व्यवहारांपुरता मर्यादित नसून तो ग्रामीण समाजरचनेतील सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संरचनांशी निकट संबंध ठेवणारा बहुआयामी घटक आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, जमीन ही फक्त उत्पादनाचे साधन नसून ती सामाजिक स्थान, प्रतिष्ठा, सत्तासंबंध आणि सामूहिक ओळख यांचे महत्त्वपूर्ण प्रतीक मानली जाते. त्यामुळे ग्रामीण समाजातील जमीन मालकीचे स्वरूप आणि तिचे वितरण हे जातीय श्रेणीबद्धतेच्या रचनेशी घट्टपणे जोडलेले आढळते. त्यामुळे भविष्यातील कृषी धोरणे सामाजिक न्याय, जमीन पुनर्वाटप आणि समावेशक विकासाच्या तत्त्वांवर आधारित असणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

1) आंबेडकर, बी. आर. जातिव्यवस्थेचे निर्मूलन. (1936)- (अनुवादक : प्रकाश सीरसट) मुंबई : उच्च व तंत्र शिक्षण विभाग 2015.

2) Choudhary, P. K. (2023). Emerging Agrarian System and Its Impact on Caste Relations. ISEC Working Paper 501.

3) Kumar, A. (2020). B R Ambedkar on Caste and Land Relations in India. Review of Agrarian Studies, 10(1), 37-56.

4) Lerche, J., & Shah, A. (2018). Conjugated oppression within contemporary capitalism: Class, caste, tribe and agrarian change in India. The Journal of Peasant Studies, 45(5-6), 927-949.

5) Sundar, M. (1999). Suicide in farmers in India. *British Journal of Psychiatry*, *175*(6), 585–586. doi:10.1192/bjp.175.6.585c

6) Round Table India. (2025). Caste, Landownership, and Its Historicity: The Redistribution Question.

7) Kotani, Huroyuki. (2002). Western India in Historical Transition, Manohar Publishers and distributor

8) https://www.loksatta.com/sampadkiya/features/mahar-watan-land-controversy-reveals-caste-and-spatial-injustice-in-maharashtra-vsd-99-5608424/

9) https://doi.org/10.25003/ras.02.02.0008

10) https://doi.org/10.1017/9781316691373.005

11) https://doi.org/10.1177/0038022919800202

12) https://doi.org/10.1016/j.cegh.2020.01.002